महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर मंडळ स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P).: (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P).:2341035

स्मरण पत्र – १

जा.क्र./छसंविमं/संकिर्ण/माध्य/4947
दि.२७/०२/२०२६ 10 03

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) विद्यार्थ्यांचा APAAR ID नोंदवून घेणेबाबत...

संदर्भ :-१) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.म./गणकयंत्र/११२/४३२०, दि.२७.११.२०२५.

२) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.म./गणकयंत्र/२३/८७३, दि.२५.०२.२०२६.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२६ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना निकालाच्या वेळी Digi locker मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका उपलब्ध करुन द्यायवाच्या आहेत. त्याकरीता विद्यार्थ्यांच्या **(APAAR ID)** ची नोंद आवश्यक आहे. त्याकरीता **(APAAR ID)** नोंदविणेकरीता राज्य मंडळाचे संकेतस्थळ **www.mahahsscboard.in** वर APAAR ID updation ही **link** उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्या द्वारे दि.३१.०३.२०२६ पर्यंत ज्या प्रविष्ठ विद्यार्थ्यांचा **APAAR ID** उपलब्ध आहे त्याची नोंद करण्यात यावी.

**(APAAR ID)** द्वारे प्राप्त Digital गुणपत्रिकांचे विद्यार्थ्यांना होणारे लाभ पुढील प्रमाणे आहे.

१. विद्यार्थ्यांचा गुणपत्रिकेचे कायमस्वरुपी **Digital Record** तयार होऊन सर्व शैक्षणिक गुणपत्रिका एकत्रित उपलब्ध होतात.
२. वेगवेगळया शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशप्रक्रिया सुलभ होते. शैक्षणिक संस्था/नियोक्ते त्वरीत पात्रता पडताळणी करु शकतात. भौतिक कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाहीशी होते.
३. सरकारी शिष्यवृत्ती व योजनांमध्ये लाभ मिळणे सुलभ होतात.
४. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी कोठूनही उपलब्ध होतात.
५. केंद्रीकृत आणि सुरक्षित प्रणालीमुळे कागदपत्रे हरवण्याचा धोका नाही.

त्यामुळे आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा **(APAAR ID)** उपलब्ध करुन त्याची नोंद मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर करणे आवश्यक आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सुविधांचा लाभ होईल

विभागीय सचिव
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

**प्रत माहितीस्तव:-**

१) मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

Desktop:/ACP